# निशाणी क्र.६६ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ९ ते १४ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द् झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून त्यांची कैफियत स्विकारण्यासाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार प्रतिवादी हे त्यांचे नोकरी व्यवसायामुळे मुंबई येथे राहतात. ते गावी येवून जावून असतात. त्यांना न्यायालयीन कामाची पुरेशी माहिती नाही. तसेच सदर दाव्याचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्र वेळीच मिळाली नाहीत. त्यामुळे त्यांना त्यांच्या वकिलांना भेटून आवश्यक माहिती देणे शक्य झाले नाही. त्यांना अलिकडेच आवश्यक कागदपत्र प्राप्त झाल्यावर ते त्यांच्या वकिलांना भेटले व माहिती दिली. त्यांची कैफियत पटलावर येणे व सदर दावा गुणदोषावर चालणे न्यायदृष्टीने गरजचे आहे, तसे न झाल्यास त्यांच्या न्यायहक्कास बाधा येवून त्यांचे पैशाचे स्वरूपात कधीही भरून येणार नाही असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, त्यांचेविरूध्द् झालेला 'विना कैफियतीचा' आदेश रद्द होवून त्यांची कैफियत स्विकारणेची विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

२. वादी हिने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून मर्जीनुरूप आदेश पारित करणेत यावा, मात्र विलंबाचे कारण संयुक्तिक नाही अस नमूद केले आहे. सबब, खर्च बसविणेत यावा अशी विनंती तिने केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादीं तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा निरंतर मनाईसाठी व अधिकार घोषणा होणेसाठी आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच

न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्या सारखे होणार आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी या अर्जासोबत शपथपत्र सादर केले आहे. त्यामुळे त्यांनी अर्जात दिलेले कारण रास्त असेल असे वाटते. मात्र, झालेल्या विलंबाबाबत त्यांनी वादीला खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादींनी रक्कम रूपये ५००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रक्कम रूपये २५०/— वादीला दयावी व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रस्तुत प्रतिवादींनी वरील पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरूध्द् झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची कैफियत स्विकारण्यात येते.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक २०/०६/२०१८